| | | | |
|---|---|---|---|
| **CRNNO-MHBU130025052020** | खटला दाखल तारीख | : | २९.१०.२०२० |
| | खटला नोंद तारीख | : | २९.१०.२०२० |
| | निकालाची तारीख | : | २४.०७.२०२६ |
| | कालावधी : ०५ वर्षे ०८ महिने २५ दिवस | | |

**चिखली  येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी **आय. ए. वाय. ए. खान यांचेसमोर**)

**संक्षिप्त फौजदारी खटला नं. १३८४/२०२०**

**निशाणी – १४**

महाराष्ट्र सरकार तर्फे

रा. उ. शुल्क, बुलडाणा

ता. व जि. बुलडाणा. **... अभियोग पक्ष**

**विरुद्ध**

शेख आरीफ शेख चांद

वय — ३० वर्षे , व्यवसाय — मजुरी

रा. शेळगाव आटोळ, ता. चिखली, जि. बुलडाणा. **... आरोपी**

**खटला– महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ड) अन्वये**

---

विद्वान विधीज्ञ —

अभियोग पक्षातर्फे – मो. बशीर मो. नसीर

आरोपी तर्फे – एस. बी. जाधव

---

# न्यायनिर्णय

## (दि. २४/०७/२०२६ रोजी जाहिर )

प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ड) अन्वये तोहमत ठेवण्यात आले.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे,**

२. दि. ०४.१०.२०२० रोजी आरोपी हा शेळगांव आटोळ येथील सरकारी दवाखान्याचे समोरील टिनशेड, चिखली येथे देशी दारु विकत असल्याची माहिती मिळाली. त्यावर पंच व पोलीसांची खात्री झाल्याने त्याच्यावर रेड मारली तेव्हा त्याच्या जवळ एका वायरच्या पिशवीत देशी दारू कंपनीच्या १८० मि.ली. क्षमतेच्या ४० सिलबंद शिशा व इतर साहीत्य जप्त केले. जप्त केलेल्या दारूमधील १८० मिलीची एक शिशी सॅंपल व विश्लेषणाकरिता काढून घेण्यात आली व पंचांच्या सहीने पंचनामा करुन जप्त करण्यात आले. त्यासंदर्भात फिर्याद देण्यात आली.

३. वरीलप्रमाणे फिर्याद प्राप्त होताच राज्य उत्पादन शुल्क, बुलडाणा येथे गु.र.क्र. ५७/२०२० महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ड) अन्वये गुन्हा नोंदविणेत आला. त्यानंतर तपास अंमलदार एस.डी. चव्हाण यांनी सदर गुह्याचा तपास केला. मुद्देमाल जप्तीचा पंचनामा केला. तपास अधिकारी यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले व गुन्ह्याचा तपास पुर्ण झाल्यानंतर त्यांनी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ड) अन्वये न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले.

४. मी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ड) अन्वये प्रतिकथन नोंदवले व त्यातील मजकुर आरोपीला समजावून सांगितला. आरोपीने सदरचा गुन्हा मान्य व कबूल नसल्याचे सांगून संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

५. आरोपीवरील दोषारोप शाबित करण्यासाठी अभियोगपक्षाने घटनास्थळ पंच शिवाजी छगन निकाळजे, (सा.क्र.१) यांना निशाणी क्र. १४ वर तपासले.

६. अभियोग पक्षाचा पुरावा झाल्यानंतर आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आलेने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता ३१३ अन्वये निवेदन वगळण्यात आले.

७. आरोपीवर ठेवण्यात आलेले प्रतिकथन, अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेला तोंडी तसेच कागदोपत्री पुरावा आणि दोन्ही बाजुंचा युक्तीवाद याचा विचार करता, पुढील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खाली दिलेली आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०४.१०.२०२० रोजी मौजे शेळगाव आटोळ, ता. चिखली, जि. बुलडाणा येथे आरोपी हा स्वतःच्या फायद्याकरिता देशी दारू विकताना दिसला, त्याअन्वये ६५(ड) मुंबई दारुबंदी कायद्याप्रमाणे शिक्षापात्र अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले काय? | **नकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त करणेत येते.** |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ बाबत–

८. आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाला सर्वप्रथम हे सिद्ध करावे लागेल की,

१) छापा टाकतेवेळी आरोपी त्याच्या ताब्यातून देशी दारु विकताना मिळून आला.

२) सदरची दारु बाळगून त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम आणि त्याअंतर्गत

करण्यात आलेले नियम याचे उल्लंघन केले.

९. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा शाबित करण्याकरीता घटनास्थळ पंच शिवाजी छगन निकाळजे (सा.क्र.१) यांना तपासले. त्याने त्याच्या सरतपासात कथन केले की, त्याला पोलीसांनी पंचनामा करण्यासाठी बोलाविले नव्हते. घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची सही आहे. त्याची सही पोलीसस्टेशन येथे घेतली होती. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे त्यांना सुचक प्रश्न विचारले. परंतु, त्यामध्ये अभियोगपक्षास उपयुक्त असा कसलाही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीवरील दोषारोप शाबित करण्याकरिता त्याचा पुरावा उपयुक्त ठरत नाही.

१०. सदरील साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्यांनी पुढील बाबी अमान्य केले की, आरोपीच्या ताब्यातुन देशी दारू जप्त केली. तसेच त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा करण्यात आला नाही. सदर मुद्देमाल आरोपीकडून पंचासमक्ष जप्त केला हे पुराव्यानिशी शाबित होत नाही. परंतु, त्यामध्ये अभियोगपक्षास उपयुक्त असा कसलाही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीवरील दोषारोप शाबित करण्याकरिता त्याचा पुरावा उपयुक्त ठरत नाही.

११. वरील पंच फितूर असल्याने पुढे आणखी साक्षीदार तपासून अभियोग पक्षाला फायदा होईल असे वाटत नसल्याने, अभियोगपक्षाला पुरेशी संधी दिल्यानंतर अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

१२. तसेच, याकामी अभिलेखावरील दाखल कागदपत्रे पाहिले असता असे दिसून येते की, रासायनिक पडताळणीचा अहवाल याकामी दाखल केलेला नाही. तसेच, संबंधित मुद्देमाल जप्तीचा पंचनामा अभियोग पक्षाने शाबीत केलेला नाही. त्यामुळे सदर जप्त मुद्देमाल हा आरोपीकडून जप्त केला हे योग्य प्रकारे शाबित झालेले नाही. फौजदारी

कायद्यातील एक महत्वाचे तत्व आहे की संशय कितीही दाट असलातरी तो पुराव्याची जागा घेवू शकत नाही. त्यामुळे, केवळ गुन्हा संशयापलीकडे सिद्ध झालेला आहे असे म्हणणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष मी नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत–</u>**

**१३.** अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप शाबीत केलेले नसल्यामुळे त्यास निर्दोष सोडणे मला योग्य वाटत आहे. मुद्दा क्र. २ करिता मी खालील आदेश पारित करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | आरोपी शेख आरीफ शेख चॉद, रा. शेळगाव आटोळ, ता. चिखली, जि. बुलडाणा यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) प्रमाणे निर्दोष ठरवून त्याला महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ कलम ६५(ड) या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीने दिलेला जमानत व वैयक्तिक जातमुचलका रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | अपील कालावधी संपल्यानंतर जप्त मुद्देमाल देशी दारू कंपनीच्या १८० मिलीच्या ४० सिलबंद शिश्या पिशवीसह, दारु वासाचे दोन प्लास्टीक ग्लास व एक प्लास्टीक मग, एक २० लिटर क्षमतेची प्लास्टीक कॅन, एका वायरच्या पिशवीमध्ये देशी दारुच्या १८० मिलीच्या ३० रिकाम्या शिश्या पुढील कारवाईसाठी राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे पाठविण्यात यावे. |

| | |
|---|---|
| ४. | अपील झाल्यास आदरणीय अपीलाचे न्यायालयात आरोपीची हजेरी निश्चित करण्याकरिता आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(१)(अ) प्रमाणे त्याचे रक्कम रुपये ७,५००/– चे वैयक्तिक जातमुचलका सादर करावे असा निर्देष देण्यात येतो. |
| | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला)** |

**sd/-**

**चिखली** **(आय.ए.वाय.ए.खान)**

**दिनांक– २४.०७.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली**